अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्यासाठी **" भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार "** योजनेकरिता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत **करण्याबाबत. लेखाशिर्ष (२२३६ १७२२).**

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः बीयुडी-२०१५/प्र.क्र.१०/कार्यासन.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: -०२ फेब्रुवारी, २०१६.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५.
२) या विभागाची नस्ती क्र. संकीर्ण - २०१५/ सं. क्र.१३४६ / का-०८.
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आविवि-२०१५/ प्र.क्र.७८/का-०८, दि. १८-११-२०१५.
४) शासन शुध्दीपत्रक क्रमांक: आदिवासी विकास विभाग क्र.आविवि-२०१५/ प्र.क्र.७८/का-०८, दि. ३०-११-२०१५.
५) शासन निर्णय समक्रमांक दि. ३० नोव्हेंबर, २०१५.

शासन शुध्दीपत्रक:-

उपरोक्त दि. ३० नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयातील मुद्या क्र. १ मधील लेखाशिर्ष "मागणी क्र ,२२३६ ,५-टी. (०५) (०१) ,(वेतनेत्तर) सहायक अनुदाने ,३१ ,पोषण आहार ,२२३६- एकुण ,जनजाति क्षेत्र उपयोजना ,पोषण आहार १९६१ ,महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमयाच्याकलम अन्वये जिल्हा परिषदांना २६१ आणि १२३ अनुदाने राज्य स्तरीय योजना)) " यापुढे संगणक सांकेतांक (CRC) **" २२३६ १७२२ "** असा वाचण्यात यावा.

२. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्या क्र. ५ हा "आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लोकांकरिता वा आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लोकांकरिता खर्च करण्यात यावी. आदिवासी उपयोजनेंतर्गत केलेली तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर किंवा सर्वसाधारण योजनेखाली खर्च करण्यात येवू नये." असा असून **सदरहू मुद्या याद्वारे वगळण्यात येत आहे.**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०२१६२७१८२३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhagwan Maruti Sawant

Digitally signed by Bhagwan Maruti Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bc0bdf8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, cn=Bhagwan Maruti Sawant
Date: 2016.02.02 17:20:58 +05'30'

भगवान सावंत
अवर सचिव

प्रत,

१. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
४. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
८. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.